पुस्तकाचे नाव - हरिश्चंद्र

लेखकाचे नाव - त्रिलोकेकर सोकर बापूजी

प्रकाशक - उपलब्ध नाही

प्रकाशन वर्ष - १८८०

किंमत - उपलब्ध नाही

पृष्ठसंख्या - ९३

सारांश –

राजा हरिशंद्राच्या जीवनावर आधारित हे संगीत नाटक आहे. त्या मध्ये कथाभागाला पोषक अशी हरिश्चंद्राच्या जीवनातील प्रसंगांची छापील चित्रे आहेत. हरिश्चंद्राच्या सत्यनिष्ठेची ऋषी विश्वमित्रांनी घेतलेली कठोर परिक्षा व त्यातून पार पडलेला राजा यांची ही कथा नाटयरुपाने मांडली आहे.

## शीर्षकपानाची प्रतिकृती



अंक १ ला.

Donated by Mukund Atmaram Deodhar To Dadar Sarvajanik Library
8404

# हरिश्चंद्रनाटक.

## अंक १ ला.

### प्रवेश १ ला.

स्थल—रंगभूमि.

पात्रें—सूत्रधार, गायकमंडळी व नट-

(सूत्रधार गायकमंडळीसह गुलाल व पुष्पें उडवीत प्रवेश करितो)

सूत्रधार व गायकमंडळी—

**मंगलाचरण श्लोक.** (शिखरिणीवृत्त)

दिसे मायायोगें सकल जगतीं जो प्रगटला ॥
स्वभक्तांच्याकार्यास्तव विविधही वेष नटला ॥
जयाच्या सृष्टीची अनुपम असे नाटककला ॥
करो वात्सल्यें तो नटवर सुसंपन्न सकलां ॥

**श्लोक** (शार्दूलविक्रीडित).

ज्यांचें ध्यान सदां मनस्थिततया मीं प्रकर्षें लया ॥
विध्वंसी तरणिप्रकाश सहसा जेवीं तमःसंचया ॥
सृष्टीच्या रचनीं सुसिद्धि घडण्या ब्रह्मा जयां चिंतितो ॥
त्यां मी श्रीगणनाथपादकमलां आरंभिं आराधितों ॥

**श्लोक.** (शार्दूलविक्रीडित).

यत्स्थानीं मकरंदरूप विलसे आनंद नित्य स्वयें ॥
योगीवृंद मिलिंदवत् रमतसे सौभाग्यचंद्रोदयें ॥
वेदांतोज्ज्वलितार्कदिव्यकिरणीं पावे विकासा सदा ॥
त्या हेरंबपदांबुजां नमितसें सद्बुद्धिकीर्तिप्रदा ॥